# कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ९७५ /२०२५ दि. १३/०८/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी**, **कल्याण** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि.१६/०८/२०२५ रोजी **'गोपाळकाला'** सणानिमित्त छत्रपति शिवाजी महाराज चौक, सहजानंद चौक टिळक चौक, शंकरराव चौक, साई चौक अशा महत्वाच्या जंक्शन पॉईटवर दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले असल्याने व गोविंदा पथकांची वाहने, गोविंदापथक व दहीहंडी उत्सव पाहण्यास येणारा जनसमुदाय यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** दुध नाका, गांधी चौक कडुन शंकरराव चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या सर्व वाहनांना **घेला देवजी** चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | गांधी चौकाकडुन येणारी सर्व प्रकारची वाहतुक घेला देवजी चौक येथुन डावे वळन घेवुन तेली गल्ली मार्गे संत सेना महाराज चौक मार्गे अहिल्याबाई चौक मार्गे डावे वळन घेवुन पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** पार नाका टिळक चौक कडुन शंकरराव चौकाकडे येणाऱ्या तसेच सहजानंद चौकातुन शंकरराव चौकात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अहिल्याबाई चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **अ)** पार नाका टिळक चौक कडुन शंकरराव चौकाकडे येणाऱ्या तसेच सहजानंद चौकाकडुन येणारी वाहने अहिल्याबाई चौक येथुन उजवे वळन घेवुन इच्छित स्थळी जातील.<br>**ब)** गांधी चौकाकडुन येणारी सर्व प्रकारची वाहतुक घेला देवजी चौक येथुन डावे वळन घेवुन तेली गल्ली मार्गे संत सेना महाराज चौक मार्गे अहिल्याबाई चौक मार्गे डावे वळन घेवुन पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** भिवंडी कडून – दुर्गाडी चौक –लालचौकी मार्गे कल्याण शहरात येणाऱ्या सर्व वाहनांना **दुर्गाडी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **अ)** सदरची मध्यम प्रकारची वाहने दुर्गाडी चौक येथे डाव्या बाजूस वळण घेवून पौर्णिमा चौक मार्गे इच्छित स्थळी जातील<br>**ब)** सदरची हलकी वाहने (कार,जीप,रिक्षा,तीनचाकी टेम्पो,दुचाकी इत्यादी) लाल चौकी येथून डाव्या बाजूस वळण घेवून आधारवाडी सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.<br>**क)** गोविंदा पथकाची वाहने कल्याण पश्चिम लालचौकी येथील वासुदेव बळवंत फडके मैदानात पार्कींग करतील. |
| **प्रवेश बंद –** | **४)** शिळ रोडने कोळसेवाडी (कल्याण पूर्व) कडून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे कल्याण शहरात येणाऱ्या अवजड व मध्यम प्रकारची वाहनांना **पत्रीपुल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **अ)** सदरची अवजड वाहने मध्यम प्रकारची वाहने पत्रीपुल येथे डाव्या बाजूस वळण घेवून गोविंदवाडी बायपास मार्गे इच्छित स्थळी जातील.<br>**ब)** गोविंदा पथकाची वाहने कल्याण पश्चिम येथिल कृषी उत्पन्न बाजार समितीचे मैदानात पार्कींग करण्यात येतील. |
| **प्रवेश बंद –** | **५)** मुरबाड रोडने व इंदिरानगर क्रॉस येथुन संतोषी माता रोडला येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मधुरिमा स्विट्स रामबाग लेन क्र.४ कल्याण (प)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | **अ)** सदरची वाहने रामबाग लेन क्र.४ – म्हस्कर हॉस्पिटल मार्गे इच्छित स्थळी जातील.<br>**ब)** गोविंदा पथकाची वाहने मॅक्सी ग्राऊंड कल्याण पश्चिम मैदानात पार्कींग करण्यात येतील. |

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दिनांक १६/०८/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. पासुन ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, कल्याण—डोंबिवली महानगरपालिका

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर

परिवहन व्यवस्थापक, कल्याण डोंबिवली महानगरपालिका

विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :— सपोआ, कल्याण व भिवंडी वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रभारी अधिकारी, कल्याण, कोळशेवाडी, डोंबिवली, कोनगाव, भिवंडी वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.